# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 23/02/2024 (शुक्रवार) सकाळ


### जिवानीशी ठार करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. कळमेश्वर:— फिर्यादी नामे— मोहित वसंतराव पुसदकर वव २१ वर्ष रा. सावंगी (शेतकी) तालुका कळमेश्वर यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे अप क्र. ४३/२१ कलम ३०२, २०१ भादवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक १७/०१/२०२१ चे १७/३० ते २०/०१/२०२१ चे १५/३० वा. दरम्यान शेतात **आरोपी नामे— रॉयसिंग भागीरथ उर्फ ठाकुरसिंग मेवाड, वय ४५ वर्ष, रा. सावंगी ता. कळमेश्वर** व मृतक नामे— वसंतराव गोंवीदराव पुसदकर वय ५१ वर्ष, रा. सावंगी दोघे बासाचे झाडाखाली पाणी पित असताना, मृतकास शेतात एकटे असल्याचा फायदा घेवुन मृतक व आरोपीच्या पत्नीचे अनैतिक संबंधाच्या कारणावरून आरोपीने मृतक यास काठी, विळा व कुऱ्हाडनी मृतकाच्या हातावर चेहऱ्यावर, गळयावर व डोक्यावर मारून जिवानिशी ठार केले.

सदर प्रकरणाचे तपास पोलीस निरीक्षक आसीफराजा शेख यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. डी. जे. ०४ श्री. पावसकर कोर्टामध्ये सादर केले. आज दिनांक २३/०२/२०२४ रोजी मा. डी. जे. ०४ श्री. पावसकर यांनी वरील नमुद आरोपीला सदर गुन्हयात कलम ३०२ भादंवि मध्ये आजीवन कारावास व १००००/— रू दंड , दंड न भरल्यास ०३ वर्ष सश्रम कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी गजभीये मॅडम यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अंमलदार म्हणुन सफौ. सुरेद्रसिंग ठाकुर पो.स्टे. कळमेश्वर यांनी मदत केली आहे.

# नागपूर ग्रामीण पोलीसांनी अवैध्य गोवंश वाहतूक करणारा ट्रक पकडुन ३३ गोंवश यांना दिले जिवनदान

दि. २२/०२/२०२४ रोजी पोलीस स्टेशन देवलापार येथील ठाणेदार सपोनि राजेश पाटील हे पोलीस स्टेशन हद्दीत स्टाफसह पेट्रोलींग करीत असतांना गोपनिय माहिती मिळाली की, जबलपुर कडुन नागपुरकडे देवलापार मार्गे वेळ १०/१५ ते ११.०० वा. दरम्यान एका ट्रकमध्ये अवैध्यरित्या जनावर वाहतूक करून देवलापार दिशेने पवनीकडे जात आहे. अशा मिळालेल्या माहीती वरून देवलापार पोलीस स्टेशन समोर नाकाबंदी लावली असता सदर वाहनाला थांबवण्याचा इशारा केला असता सदर वाहन पवनीच्या दिशेने पळुन गेल्याने हायवे क्र. ४४ जबलपुर ते नागपुर रोडवर पवनी या ठिकाणी स्टाफसह एका संशयीत वाहनाचा पाठलाग केला असता व सदर वाहनाची खबरीने सांगितलेल्या माहीती प्रमाणे ट्रक क्र. MH-42/T-9125 चा पाठलाग करून पवनी या ठिकाणी थांबवुन सदर वाहनाची तपासणी केली असता ट्रक मध्ये आखुड दोरखंडाने गोवंशाचे तोंड, मान, पाय अत्यंत क्रुरतेने व निर्दयतेने बांधलेले एकुण ३३ गोवंश गायी (बैल) असे एकुण जनावरे किंमती ४,२००००/— रू. व वाहन ट्रक क्र. MH-42/T-9125 किंमती १५,००,०००/— रू. असा एकुण १९,२०,०००/—रू चा मुद्देमाल जप्त करुन जनावरांची योग्यरित्या चारा—पाणी व देखभाल होणे करीता सदरची जनावरे गोशाळा देवलापार येथे दाखल करण्यात आले व **आरोपी नामे— १) तोफीक खान अयुब खान वय ३२ वर्षे, रा. मेमन कॉलनी यवतमाळ जि. यवतमाळ (कंडक्टर) २) फरार ट्रक चालक** यांचे विरुद्ध अवैद्यरित्या जनावरांची वाहतुक केल्याने नमुद आरोपीतांविरुद्ध अप क्र. ४६/२४ कलम २७९, ३४ भादंवि सहकलम ११(१), (ड) प्राण्यांचा छळ प्रतिबंध अधिनियम सहकलम ५(अ), ९ महा. प्राणी संरक्षण अधिनियम, सहकलम १८४ मोवाका. सहकलम ११९ मपोका. अन्वये गुन्हा नोंद करुन तपासावर आहे.

सदरची कार्यवाही मा. श्री. हर्ष ए. पोद्दार पोलीस अधिक्षक ना.ग्रा, मा. श्री. रमेश धुमाळ अपर पोलीस अधिक्षक नाग्रा, व मा. श्री. रमेश बरकते सहा. पोलीस अधिक्षक, उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक यांच्या मार्गदर्शनात सपोनि राजेश पाटील ठाणेदार पो.स्टे. देवलापार, पोउपनी शरद गायकवाड, पोहवा सलिम, राहुल रंगारी पोना शिवा नागपुरे, प्रमोद मडावी पोशि केशव फड, सचिन येलकर, मनिश चौकसे, कांती हराळ चापोशि फारूक मुंजेवार यांनी केली असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा राहुल रंगारी हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर